प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय व उपआयुक्त (अर्थ व नियोजन), गट-अ (तांत्रिक) या पदावर पदोन्नतीने पदस्थापना देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन आदेश क्रमांक : मत्स्यआ-२०२६/प्र.क्र.२९/पदुम-१२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०७/०७/२०२६

शासन आदेश :-

मत्स्यव्यवसाय विभागाच्या अधिपत्याखाली आयुक्त मत्स्यव्यवसाय यांच्या कार्यालयातील सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, गट-अ (तांत्रिक) या संवर्गातून प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय व उपआयुक्त (अर्थ व नियोजन), गट-अ (तांत्रिक) या पदावर रु.१५६००-३९१०० (ग्रेड पे ६६००) (६ व्या वेतन आयोगानुसार), S-२३ - ६७७००-२०८७०० ( ७ व्या वेतन आयोगानुसार ) या वेतनश्रेणीतील पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यास शासन मान्यता देत आहे. तसेच त्यांची पदोन्नतीनंतरची पदस्थापना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | सध्याचे कार्यालय व पदनाम | पदोन्नतीनंतरचे पदनाम व कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | श्री.संजय वा. पाटील | सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, रायगड-अलिबाग | प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय, नाशिक |

२. उपरोक्त अधिकाऱ्यांना खालील अटींच्या अधीन राहून प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

सदर पदोन्नती ही मा.सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अधीन राहून पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दिनांक २५/०५/२००४ स्थित सेवाज्येष्ठतानुसार, निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात भरण्याबाबत सा.प्र.वि./१६-ब कार्यासनाच्या दिनांक ७/०५/२०२१ च्या शासन निर्णयानुसार दिलेल्या सूचनांनुसार सदर मान्यता देत आहे. तसेच दिनांक ७/०५/२०२१ च्या शासन निर्णयाप्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हान देण्यात आलेले असून त्यावरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून सहमती देण्यात येत आहे.

३. सदर पदोन्नत अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, त्यांनी पदोन्नतीचे/नियुक्तीचे आदेश प्राप्त झाल्यापासून तात्काळ नियुक्तीच्या ठिकाणी हजर होणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे ते विहीत मुदतीत नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाले नाहीत, तर त्यांना सदर पदोन्नतीमध्ये स्वारस्य नाही असे गृहीत धरुन शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/का-१२,

दिनांक १२.९.२०१६ मधील तरतुदीनुसार शासन स्तरावरुन त्यांची पदोन्नती रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

४. आयुक्त मत्स्यव्यवसाय यांना कळविण्यात येते की, वरील पदोन्नत अधिकारी हे नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यासाठी त्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच सदर अधिकारी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत शासनास त्वरीत अवगत करावे.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतां २०२६०७०७१११४०११००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

JAKHATE KISHOR MAHADEO

Digitally signed by JAKHATE KISHOR MAHADEO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Fisheries Department, 2.5.4.20=83112E1445917D0A21FBAB36D7C0FF41E09863C93A2E62EA1B0C01DA16B7A161, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=032A6ACBFD529D66DD76E26EAB14B28C6DD07D2F776E529B44BA2CB45324C503, cn=JAKHATE KISHOR MAHADEO
Date: 2026.07.07 11:14:54 +05'30'

**( कि. म. जकाते )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री (मत्स्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. सर्व मा. विधानसभा सदस्य, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. सर्व मा. विधानपरिषद सदस्य, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७. अ. मु. स.(सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. सचिव (पदुम), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. महालेखापाल (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १, मुंबई/नागपूर.
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, रायगड-अलिबाग/नाशिक
१३. निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
१४. प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, सर्व
१५. संबंधित अधिकारी (आयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई यांचेमार्फत)
१६. निवडनस्ती पदुम-१२.